## 6. संघराज्य व त्याचे राज्यक्षेत्र
## भाग I : कलम 1 ते 4

**कलम 1 : संघराज्याचे नाव व त्याचे राज्यक्षेत्र**

- 1.1 - इंडिया, अर्थात भारत हा राज्यांचा संघ असेल.
- 1.2 - घटकराज्ये व केंद्रशासित प्रदेशांची नावे, त्यांची राज्यक्षेत्र पहिल्या अनुसूचीमध्ये दिल्याप्रमाणे असतील.
- 1.3 - भारताचे राज्यक्षेत्र पुढील बाबीचे मिळुन बनलेले असेल.
  - i) घटकराज्य
  - ii) केंद्रशासित प्रदेश
  - iii) संपादित केली जातील असे अन्य राज्यक्षेत्र

भारताचे वर्णन संघराज्य ऐवजी राज्याचा संघ करण्यामागे उद्देश-

- i) हे संघराज्य राज्याच्या कराराने निर्माण झाले नाही.
- ii) घटकराज्यांना संघराज्यातून बाहेर पडण्याचा अधिकार नाही. यामुळे भारतीय अविभाज्य व अखंड देश म्हणुन ओळखला जात असला तरीही प्रशासकीय सोयीसाठी राज्यामध्ये विभागणी करण्यात आली आहे. त्यामुळे सध्या 28 घटकराज्ये व 8 केंद्रशासित प्रदेश परिशिष्ठ 1 मध्ये समाविष्ट आहेत.

**कलम 2**

**नवीन राज्य दाखल करुन घेणे/स्थापना करणे**

- संसदेला योग्य वाटतील अशा अटी व शर्तीवर कायद्याद्वारे नवीन राज्य संघराज्यात दाखल करुन घेण्याचा किंवा स्थापन करण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

**कलम 3**

**नवीन राज्याची निर्मिती आणि विद्यमान राज्याची क्षेत्र, सिमा, नाव यात फेरफार करण्याचा संसदेला अधिकार**

- संसद कोणत्याही राज्यापासून एखादे राज्यक्षेत्र अलग करुन किंवा दोन किंवा अधिक राज्ये किंवा राज्याचे भाग एकत्र जोडून किंवा कोणतेही राज्यक्षेत्र राज्याच्या एखाद्या भागाशी जोडुन नवीन राज्याची निर्मिती करते.
- 1955 ची 5 वी घटनादुरुस्ती करुन या कलमात 2 अटींचा समावेश केला आहे.
  - i) असे विधेयक राष्ट्रपतीच्या शिफारशीशिवाय संसदेत मांडता येणार नाही.
  - ii) शिफारशीपूर्वी राष्ट्रपतींनी ते विधेयक संबंधित राज्याच्या विधिमंडळाकडे विचारात पाठवावे लागले.

**कलम 4**

**कलम 2 अंतर्गत नवीन राज्य दाखल करुन घेणे, स्थापन करणे तसेच कलम 3 अंतर्गत नवीन राज्याच्या निर्मितीबरोबरच त्याची क्षेत्र सीमा नाव यात फेरफार करण्यासाठी करण्यात आलेला कायदा कलम 368 अंतर्गत घटना दुरुस्ती कायदा समजण्यात येणार नाही.**

- याच कलमानुसार बेरुबारी युनियन खटला 1960 याबाबत सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला.
- भारतीय राज्यक्षेत्र परकीय देशास बहाल करण्यासाठी संसदेला घटनादुरुस्ती करावी लागेल. त्यामुळेच पश्चिम बंगालमधील बेरुबारी युनियन हा प्रदेश पाकला देण्यासाठी 1960 ची 9 वी घटनादुरुस्ती करावी लागली.
- 2016 मध्ये भारतातील भूप्रदेश बांग्लादेशला देण्यासाठी 2016 ची 100 वी घटनादुरुस्ती करावी लागली.

**28 घटकराज्ये आणि 8 केंद्रशासित प्रदेश यांच्या निर्मितीचा प्रवास**

- 18 जुलै, 1947 च्या भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्याने भारत व पाक दोन राष्ट्र निर्माण झाली. तत्कालीन हिंदुस्थानमधील 562 संस्थानिक सार्वभौम झाली. संस्थानिकाकडे 3 पर्याय होते.
  - i) भारतात विलीन होणे.
  - ii) पाकिस्तानमध्ये विलीन होणे.
  - iii) स्वतंत्र राहणे.
- त्यामुळे या संस्थानिकांची भारतात विलीनीकरण करणासाठी 27 जुन, 1947 रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली राज्य विभागाची स्थापना करण्यात आली. याद्वारे 552 पैकी 549 संस्थाने भारतात विलीन केली तर 3 संस्थाने टप्याटप्याने भारतात विलीन करण्यात आली.
  - i) जम्मू-काश्मीर - 26 ऑक्टोबर, 1947
  - ii) जुनागड - फेब्रुवारी, 1948
  - iii) हैद्राबाद - 13 ते 17 सप्टेंबर, 1948 (पोलीस कारवाई)

**राज्य निर्मितीसाठी आयोग व समित्या :-**

**1) एस.के. धर आयोग -**

- स्थापना - 17 जून, 1948

- अहवाल सादर - डिसेंबर, 1948
- शिफारस - भाषा आणि संस्कृती हा निकष रद्द करुन राज्याच्या निर्मितीसाठी प्रशासकीय सोय हा निकष जाहीर केला.
- मात्र या आयोगाने भाषिक तत्त्वावर आंध्रप्रदेश राज्याच्या निर्मितीस अनुकूलता दर्शविली.

**2) जे.व्ही.पी. समिती -**

- **जे** - जवाहरलाल नेहरु, **व्ही** - वल्लभभाई पटेल, **पी** - पट्टाभी सितारामय्या.
- स्थापना - डिसेंबर, 1948
- अहवाल सादर - एप्रिल, 1949
- शिफारस - राज्य पुनर्रचनेसाठी भाषा हा आधार ठेवण्यास नकार दिला.

**3) वांच्छू समिती -**

- स्थापना - डिसेंबर, 1950
- अहवाल सादर - ऑक्टोबर, 1953
- जे.व्ही.पी. समितीने दिलेल्या शिफारशीवरुन मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाल्यामुळे सरकारने वांच्छू समितीची स्थापना केली.
- या समितीच्या शिफारशीनुसार भाषीक तत्त्वावर पहिले राज्य मद्रासमधुन आंध्रप्रदेश निर्माण झाले, त्याची पहिली राजधानी कर्नुल होती तर उच्च न्यायालय गुंटूर येथे स्थापन करण्यात आले.

**❍ राज्यपुर्नरचना आयोग :-**

- स्थापना - डिसेंबर, 1953
- अहवाल सादर - सप्टेंबर, 1955
- अहवालास मान्यता - 30 ऑगस्ट, 1956
- शिफारशीची अंमलबजावणी - 1 नोव्हेंबर, 1956
- अध्यक्ष - फजल अली
- सदस्य - के.एम. पन्नीकर, ह्दनाथ कुंझरू
- शिफारस - 16 राज्ये व 3 केंद्रशासित प्रदेश निर्माण करुन राज्यप्रमुखाचे पद रद्द करावे.
- या आयोगाने 1 भाषा - 1 राज्य या तत्त्वास मान्यता न देता भारताच्या एकात्मतेला प्राधान्य देऊन राज्याच्या निर्मितीची शिफारस केली परंतु या आयोगाने सुचविलेल्या 16 राज्य आणि 3 केंद्रशासित प्रदेशाऐवजी सरकारने 14 राज्ये आणि 6 केंद्रशासित प्रदेश निर्माण केले.
- **चार अटी -**
  1) राष्ट्रीय एकता.
  2) सांस्कृतिक व सामाजिक एकजिनसीपणा.
  3) वित्तीय, आर्थिक बाबींना प्राधान्य.
  4) लोककल्याण साध्य करणे.

**❍ 1 नोव्हेंबर, 1956 रोजी स्थापन झालेले राज्ये व केंद्रशासित प्रदेश :-**

| क्र. | राज्ये | क्र. | केंद्रशासित प्रदेश |
|---|---|---|---|
| 1. | आंध्रप्रदेश | 1. | अंदमान आणि निकोबार बेटे |
| 2. | आसाम | 2. | दिल्ली |
| 3. | बिहार | 3. | हिमाचल प्रदेश |
| 4. | बॉम्बे | 4. | लॅकेंदीव, मिनिकॉय व अमीनदिवी बेटे |
| 5. | जम्मू आणि काश्मिर | 5. | मणिपूर |
| 6. | केरळ | 6. | त्रिपुरा |
| 7. | मध्यप्रदेश | | |
| 8. | मद्रास | | |
| 9. | म्हैसूर | | |
| 10. | ओरिसा | | |
| 11. | पंजाब | | |
| 12. | राजस्थान | | |
| 13. | उत्तरप्रदेश | | |
| 14. | पश्चिम बंगाल | | |

**❍ 1956 नंतरची नवीन राज्ये व केंद्रशासित प्रदेश :-**

- 1960 - बॉम्बे प्रांतातून महाराष्ट्र व 15 वे राज्य गुजरात यांची निर्मिती करण्यात आली.
- 1961 - पासून दादरा व नगरहवेलीचा भारतीय संघात समावेश (10 वी घटनादुरुस्ती)
- 1962 - गोवा, दमण व दीव भारतीय संघात समावेश. (12 वी घटनादुरुस्ती)
- 1962 - पाँडेचेरी चा भारतीय संघात समावेश. (14 वी घटनादुरुस्ती)
- 1963 - आसाम मधील Naga Hill & Tuensang क्षेत्र बाजूला काढून 16 वे राज्य नागालँड बनविण्यात आले.
- 1966 - शहा आयोग (1966) च्या शिफारशी वरुन पंजाब प्रांतातून पंजाबी भाषिकांसाठी पंजाब व हिंदी भाषिकांसाठी 17 वे राज्य हरियाणा व केंद्रशासित प्रदेश चंदिगड यांची निर्मिती करण्यात आली.
- 1971 - केंद्रशासित प्रदेश हिमाचल प्रदेश हे 18 वे राज्य बनले.
- 1972 - 19 वे मणिपूर, 20 वे त्रिपुरा, 21 वे मेघालय या राज्यांची निर्मिती झाली.
- 1975 - 22 वे सिक्किम राज्य अस्तित्वात आले. (36 वी घटनादुरुस्ती)
- 1986 - 23 वे मिझोराम, 24 वे अरुणाचल प्रदेश ही राज्ये अस्तित्वात आली.
- 1987 - 25 वे गोवा हे राज्य अस्तित्वात आले.
- 2000 - मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश व बिहार मधून अनुक्रमे 26 वे छत्तीसगढ, 27 वे उत्तरांचल, 28 वे झारखंड.
- 2 जून, 2014 - 29 वे आंध्रप्रदेशमधून तेलंगणा राज्य अस्तित्वात आले (10 जिल्हे, 17 लोकसभा मतदारसंघ, 7 राज्यसभा मतदारसंघ, 119 विधानसभा संघ, 40 जागा विधान परिषदेतील)

❍ **भारतातील विविध राज्य/केंद्रशासित प्रदेश व त्यांच्या निर्मितीच्या तारखा**

| अ.क्र. | राज्याचे नाव | स्थापना दिनांक |
|---|---|---|
| 1. | आंध्रप्रदेश | 01 ऑक्टोबर, 1953 |
| 2. | आसाम | 01 नोव्हेंबर, 1956 |
| 3. | बिहार | 01 नोव्हेंबर, 1956 |
| 4. | कर्नाटक (आधीचे म्हैसूर राज्य) 1973 साली नाव बदलले | 01 नाव्हेंबर, 1956 |
| 5. | केरळ | 01 नोव्हेंबर, 1956 |
| 6. | मध्यप्रदेश | 01 नोव्हेंबर, 1956 |
| 7. | ओडिशा | 01 नोव्हेंबर, 1956 |
| 8. | राजस्थान | 01 नोव्हेंबर, 1956 |
| 9. | तामिळनाडू (आधीचे मद्रास राज्य) 1969 साली नाव बदलेले | 01 नोव्हेंबर, 1956 |
| 10. | उत्तर प्रदेश | 01 नोव्हेंबर, 1956 |
| 11. | पश्चिम बंगाल | 01 नोव्हेंबर, 1956 |
| 12. | महाराष्ट्र | 01 मे, 1960 |
| 13. | गुजरात | 01 मे, 1960 |
| 14. | नागालँड | 01 डिसेंबर, 1963 |
| 15. | पंजाब | 01 नोव्हेंबर, 1966 |
| 16. | हरियाणा | 01 नोव्हेंबर, 1966 |
| 17. | हिमाचल प्रदेश | 25 जानेवारी, 1971 |
| 18. | मणिपूर | 21 जानेवारी, 1972 |
| 19. | त्रिपुरा | 21 जानेवारी, 1972 |
| 20. | मेघालय | 21 जानेवारी, 1972 |
| 21. | सिक्कीम | 26 एप्रिल, 1975 |
| 22. | अरुणाचल प्रदेश | 20 फेब्रुवारी, 1987 |
| 23. | मिझोराम | 20 फेब्रुवारी, 1987 |
| 24. | गोवा | 30 मे, 1987 |
| 25. | छत्तीसगढ | 01 नोव्हेंबर, 2000 |
| 26. | उत्तरांचल | 09 नोव्हेंबर, 2000 |
| 27. | झारखंड | 15 नोव्हेंबर, 2000 |
| 28. | तेलंगणा | 02 जुन, 2014 |

| अ.क्र. | केंद्रशासित प्रदेश नाव | तारीख |
|---|---|---|
| 1. | अंदमान आणि निकोबार बेटे | 01 नोव्हेंबर, 1956 |
| 2. | दिल्ली | 01 नोव्हेंबर, 1956 |
| 3. | लक्षद्विप | 01 नोव्हेंबर, 1956 |
| 4. | दीव व दमन व दादर नगर हवेली | 1961 (एकत्र 26 जानेवारी 2020) |
| 5. | पाँडेचेरी | 16 ऑगस्ट, 1962 |
| 6. | चंदीगड | 1 नोव्हेंबर, 1966 |
| 7. | जम्मू-काश्मीर | 31 ऑक्टोबर, 2019 |
| 8. | लडाख | 31 ऑक्टोबर, 2019 |

❍ **राज्याची बदललेली नावे :-**

- 1950 - संयुक्त प्रांताचे उत्तरप्रदेश
- 1969 - मद्रास चे तामिळनाडू
- 1973 - म्हैसूर चे कर्नाटक
- 1973 - लॅकॅडिव्ह, मिनीकॉय, अमिनदिवी चे लक्षद्वीप
- 1 फेब्रुवारी, 1992 - दिल्ली चे दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्र (69 वी घटनादुरुस्ती)
- 2006 - उत्तरांचल चे उत्तराखंड
- 2006 - पाँडिचेरी चे पुद्दुचेरी
- 2011 - ओरिसा चे ओडिशा

❍ **राजधानीचे बदललेली नावे :-**

- 1995 - बॉम्बे चे मुंबई
- 1996 - मद्रास चे चेन्नई
- 2001 - कलकत्ताचे कोलकत्ता
- 2014 - बेंगलोर चे बंगळुरू
- 2018 - अलाहाबाद चे प्रयागराज

❍ **राज्यांची वैशिष्ट्ये :-**

- **एक राजधानी असलेले राज्य -**
  - i) पंजाब व हरियाणा - चंदीगड
  - ii) आंध्रप्रदेश व तेलंगणा - हैद्राबाद
- **दोन राजधानी असलेले राज्य -**
  - i) जम्मू-काश्मीर - श्रीनगर (उन्हाळी) व जम्मू (हिवाळी)
- **तीन राजधानी असलेले राज्य -**
  - i) आंध्रप्रदेश -
  - 1) प्रशासकीय राजधानी - विशाखापट्टणम
  - 2) राजकीय राजधानी - अमरावती
  - 3) न्यायीक राजधानी - कर्नूल
- **सात भगिनी (7 Sisters) म्हणून ओळख असलेले राज्ये -**
  - i) त्रिपुरा
  - ii) मणिपूर
  - iii) मेघालय
  - iv) अरुणाचल प्रदेश
  - v) आसाम
  - vi) नागालँड
  - vii) मिझोराम

**केंद्रशासित प्रदेशातून घटक राज्याचा दर्जा मिळालेले राज्ये-**

- मणिपूर
- त्रिपूरा
- हिमाचल प्रदेश
- मिझोराम
- गोवा
- अरुणाचल प्रदेश

# भारतीय राज्यव्यवस्था नोट्स

- **विशेष दर्जा असलेले राज्य :-**

| राज्य | कलम |
|---|---|
| जम्मू-काश्मीर | 370 (रद्द) |
| महाराष्ट्र | 371 |
| गुजरात | 371 |
| नागालँड | 371(A) |
| आसाम | 371(B) |
| मणिपूर | 371(C) |

| राज्य | कलम |
|---|---|
| आंध्रप्रदेश-तेलंगणा | 371(D,E) |
| सिक्कीम | 371(F) |
| मिझोराम | 371(G) |
| अरुणाचल प्रदेश | 371(H) |
| गोवा | 371(I) |
| कर्नाटक | 371(J) |